# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**चायनीज पदार्थामध्ये बंद वापरण्यात येणा-या अजिनोमोटो पावडरमुळे आरोग्याला निर्माण झालेला धोका**

**(१) १८२७ (२३-१२-२०१४). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न व औषधी द्रव्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चायनीच खाद्यपदार्थामध्ये चवीसाठी रस्ते फुटपाथवरील चायनीज पदार्थाच्या गाड्या बंद वापरण्यात येणा-या अजिनोमोटो पावडरमुळे आरोग्याला धोका असून त्यामुळे शरीरातील हाडे ठिसुळ होत असून काही वेळा कॅन्सर देखील होत असल्याचा माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीश बापट (१८-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये निकृष्ट दर्जाची औषधे जप्त केल्याबाबत**

**(२) ११७२४ (०६-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २८१ शासकीय रुग्णालयांची तपासणी करुन निकृष्ट औषध दर्जाच्या ३३५ नमुने जप्त करुन अयोग्य पध्दतीने औषधांचा साठा ठेवल्याबद्दल संबंधितावर विभागीय कारवाई अहवाल पाठविणेबाबत आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्व रुग्णालयांची तपासणी करुन निकृष्ट दर्जाच्या औषधींच्या साठ्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे ?

**श्री. गिरीश बापट (१८-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.

तथापि, माहे जानेवारी, २०१५ मध्ये अन्न व औषध प्रशासनाद्वारे शासकीय व निमशासकीय रुग्णालयातील औषध भांडाराची तपासणी मोहिम राबविण्यात आली होती. त्यावेळी एकूण २७० शासकीय व निमशासकीय रुग्णालयातील औषध भांडाराची तपासणी करण्यात आली व त्यामधून एकूण ३५२ नमुन्यांचे विश्लेषण केले असून त्यापैकी २२ नमुने अप्रमाणित घोषित झाले आहेत.

अप्रमाणित औषधी नमुन्यांप्रकरणी प्रत्येक औषधाबाबत उत्पादकाच्या स्तरापर्यन्त चौकशी व तपास करण्यात येवून केंद्र शासनाच्या धोरणानुसार उत्पादकांविरूध्द न्यायालयीन कारवाई करण्यात येते व विक्रीकरिता उपलब्ध असलेला अप्रमाणित औषधी साठा बाजारातून परत मागविण्यात येतो. तसेच संबंधितांविरूध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० अंतर्गत तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते.

(२) वरीलप्रमाणे

---

**समुद्रपूर (जि.वर्धा) तालुक्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(३) १२७६२ (०८-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्रपूर (जि.वर्धा) येथे अल्प पाऊस पडल्याने डिसेंबर महिन्यात पाणी पातळी खालावली असल्याने तालुक्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याचे डिसेंबर, २०१४ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर विषयावर मात करण्याकरिता शासनाने कोणती ठोस भूमिका वा निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी शासनामार्फत करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.

माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान पाणी टंचाई निर्माण झालेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कात्रण भेलाडी वाडी (ता.दापोली जि.रत्नागिरी) नवीन नळपाणी योजना सुरु करण्याबाबत**

**(४) १६४३५ (२९-०७-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कात्रण भेलाडी वाडी (ता.दापोली जि.रत्नागिरी) या दुर्गम भागात नवीन नळपाणी पाईपलाईनसाठी पेयजल योजनेतून मंजूरी मिळाली आहे परंतु ठेकेदाराने वेळेत काम न

केल्यामुळे येथील ग्रामस्थांना गत दोन वर्षे तीव्र पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त नळपाणी पुरवठा योजनेबाबत शासनाने चौकशी करुन येथील पाणी टंचाई दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोराणे (जि.धुळे) गावासाठी स्वतंत्र पाणी योजना उपलब्ध करून देण्यासाठी मागणी**

**(५) १६४६५ (२९-०७-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोराणे (जि.धुळे) गावासाठी स्वतंत्र पाण्याची योजना नसल्याने, येथील नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून स्थानिक ग्रामस्थांनी शासनाकडे वारंवार स्वतंत्र पाणी योजना उपलब्ध करुन देण्यासाठी मागणी केली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बाबतीत शासनाने काही उपाय योजना केली वा करण्यात आली आहे, त्याचा तपशिल काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :**(१) भटकंती करावी लागत आहे हे खरे नसून स्वतंत्र योजनेची मागणी करण्यात आली आहे हे खरे आहे.
(२) मोराणे, ता.जि.धुळे या गावास दरडोई ४० लिटर पाणी पुरवठा व्हावा यासाठी नवीन नळ पाणी पुरवठा योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ या वर्षाच्या कृती आराखड्यात समाविष्ट असून सदर योजनेस आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेसह सदर योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेरळ (जि.रायगड) ग्रामपंचायतीमधील कोंबलवाडी या आदिवासी वाडीकडे जाणारी जलवाहिनी दुरुस्त करण्याबाबत**

**(६) १६५९८ (२९-०७-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ (जि.रायगड) ग्रामपंचायतीमधील कोंबलवाडी या आदिवासी वाडीकडे जाणारी जलवाहिनी माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान तुटली होती ती अजून दुरुस्त करण्यात आली नाही. त्यामुळे ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचे माहे, एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी वाडीला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) ग्रामपंचायत नेरळ ( ता.कर्जत) यांनी जलवाहिनी दुरुस्त करुन पाणी पुरवठा चालु केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अन्न सुरक्षा कायद्यात बदल करून सार्वजनिक वितरण व्यवस्था सर्वांसाठी खुली करण्याबाबत**

**(७) १७४२२ (३१-०७-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन अन्न सुरक्षा कायद्यात बदल करीत असून या कायद्याच्या कक्षेत येणा-या देशातील ६७ टक्के कुटुंबाची संख्या ४० टक्क्यावर आणणार असल्याचे दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोट्यवधी गरिब नागरिकांसाठी अन्नदायी ठरणाऱ्या योजना शासनाच्या अनास्थेमुळे केवळ कागदोपत्रीच राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने किती नागरिकांना योजनेचा फायदा देण्यात आला आहे वा देण्यात येत आहे व राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्था सर्वांसाठी खुली करण्यासह रेशनवर धान्याचे प्रमाण वाढविणे, डाळी व खाद्यतेल देणे याबाबत निर्णय घेऊन शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (१४-०९-२०१५) :**(१) व (२) नाही.

(३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत राज्यातील ७००.१६ लक्ष लाभार्थ्यांना वर नमूद केलेल्या परिमाणात अन्नधान्याचा लाभ देण्यात येत आहे. लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत डाळींचे वितरण करण्यात येत नाही. पामतेल वितरणाच्या योजनेस केंद्र शासनाने माहे डिसेंबर, २०१२ नंतर मुदतवाढ दिली नसल्याने पामतेलाचे वितरण करण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेवरे (ता.रत्नागिरी) येथील खाडीचे पाणी दुषित झाल्याबाबत**

**(८) १७५५९ (२९-०७-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवरे (ता.जि.रत्नागिरी) येथे खाडीच्या पाण्यात मोठ्या प्रमाणावर ब्लिचिंग पावडर टाकून मासेमारीसह खाडीचे पाणी दुषित होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) या प्रकरणी रत्नागिरी ग्रामीण पोलीस, ठाणे, जि.रत्नागिरी यांचेकडून संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्राहकांना औषध खरेदी केल्यानंतर बिल देत नसलेल्या औषध दुकानदारांविरोधात कारवाई करण्याबाबत**

**(९) १७८२० (०६-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्राहकांना औषध खरेदी केल्यानंतर बिल देत नसलेल्या औषध दुकानदारांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने कारवाईचा बडगा उभारला असुन यामुळे काही दिवसापूर्वी मुंबई आणि ठाण्यातील काही औषध दुकानाची पाहणी केली असता ग्राहकांना बिल न देणा-या अंदाजे २५ दुकानदारांना एफडीएने नोटीस बजावल्या असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाच्या नियमावलीनुसार औषधाची खरेदी केल्यावर औषधाचे बिले घेणे हा ग्राहकांचा अधिकार आहे परंतु काही ठिकाणी औषध दुकानदार बिल देत नसुन दुर्लक्ष करीत असल्याने ग्राहकांचे हितास धोका आहे हे पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-०९-२०१५) :**(१) नियमित तपासण्याच्यावेळी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदीनुसार कायद्याचे उल्लंघन करताना आढळून आलेल्या दुकानदारांविरुध्द नियमानुसार कारवाई केली आहे.

(२) औषधांची बिले देणे हे कायद्यानुसार बंधनकारक असून, बिले न देणाऱ्या औषध विक्रेत्यांविरूध्द अन्न व औषध प्रशासनामार्फत कारवाई करण्यात येते.

ठाणे विभागामार्फत माहे एप्रिल, २०१५ या कालावधीत औषध विक्री बिल न दिल्यामुळे ५२ प्रकरणी औषध दुकानदारांविरुध्द कारवाई करण्यात आली असून ५० पेढयांचे परवाने निलंबित केले असून ०२ प्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे.

बृहन्मुंबई विभागाद्वारे माहे एप्रिल वा त्यादरम्यान केलेल्या तपासणी परवाना प्राधिकारी यांनी एकूण २२ औषध दुकानदारांना औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदींच्या उल्लंघनासाठी कारणे दाखवा नोटीसा बजावल्या असून ८ पेढ्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पूर (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) गेल कंपनीच्या पाईपलाईनची खोदाई करताना पाणीपुरवठा करणारी विहीर कोसळल्याबाबत

**(१०) १८४२५ (२९-०७-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) या गावामध्ये गेल कंपनीच्या पाईपलाईनची खोदाई करताना लावलेल्या सुरुगांमुळे गावाला पाणीपुरवठा करणारी विहीर कोसळली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विहीर कोसळल्यामुळे गत वर्षभर ग्रामस्थांचे पाणी बंद झाले असून त्यांना पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विहीर दुरुस्तीबाबत ग्रामस्थांनी गेल कंपनी तसेच देवरुख पंचायत समितीकडे वारंवार तक्रार करुनही दुर्लक्ष करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली तसेच विहिरीच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) ग्रामस्थांनी गेल कंपनीच्या प्रतिनिधींना प्रत्यक्ष ग्रामसभेत बोलावून तक्रार केलेली आहे. तसेच ग्रामपंचायतीने पंचायत समितीकडे अतिवृष्टीमुळे विहीर कोसळल्याचे कळविलेले आहे.
(४) सदर विहीरीची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असून तेथे अतिवृष्टीच्या निधीमधून नव्याने विहीर प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच ग्रामपंचायतीच्या ठरावानुसार गेले कंपनीने विहीरीचे नुकसानीबाबत विचार करण्यात येईल असे सांगितले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पाणी योजना बंद आणि नादुरुस्त असल्याबाबत

**(११) १८४२८ (२९-०७-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ४८ पाणी योजना बंद आणि ९७ पाणीयोजना नादुरुस्त असून त्यामुळे सदर तालुक्याला भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यातील ९७ विहिरींमधील गाळ न उपसल्याने या विहिरी बंद पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विहिरींचा गाळ उपासण्यासाठी शासनाकडून किती निधीची तरतूद करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) विहिरींमधील गाळ काढणेसाठी मागणीनुसार नरेगा अंतर्गत निधी उपलब्ध होतो. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना सन २०१४-१५ च्या आराखड्यामध्ये ९७ विहिरीतील गाळ काढणेची कामे समाविष्ट आहेत व त्यासाठी रुपये ८३.०८ लाख रकमेची तरतूद आहे. त्यापैकी महात्मा फुले अभियान अंतर्गत ४ कामे पूर्ण आहेत व रुपये १.८३ लाख खर्च करण्यात आलेला आहे. उर्वरित विहिरीतील गाळ काढणेसाठी ग्रामपंचायतीकडून कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा व पारनेर तालुक्यामध्ये दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(१२) १८८८५ (२९-०७-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (अहमदनगर) तालुक्यातील १९७४ पिण्याच्या पाण्याच्या साठ्यांपैकी ३६१ पाणीसाठे दूषित आढळल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पारनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील २६ गावांमध्ये टँकरद्वारे दूषित पाणीपुरवठा होत असल्याने लहान मुलांमध्ये आजाराचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोणकोणत्या गावात दूषित पाणीसाठे आढळून आले आहेत,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, उक्त ठिकाणच्या नागरिकांना शुध्द पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) जैविक तपासणी अंती श्रीगोंदा तालुक्यात माहे डिसेंबर, २०१४ मध्ये १३ गावात ४५ स्त्रोत दुषित आढळून आले आहेत.

(४) होय, सर्व गटविकास अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांचेमार्फत ग्रामपंचायतीस कळविण्यात आले असून सदर गावात योग्य ती कार्यवाही करुन नागरीकांना शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत सूचित करण्यात आले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात धान्य साठ्यासाठी गोदामे बांधण्याबाबत

**(१३) १९०४७ (३१-०७-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात धान्य साठ्यासाठी गोदामे बांधण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०९-२०१५) :**(१) होय.

(२) आदिवासी उपयोजने अंतर्गत उपलब्ध निधीतून आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेल्या धानाच्या साठवणूकीसाठी शहापूर तालुकयातील खर्डी येथील १०८० मे.टन क्षमतेच्या गोदाम बांधकाम प्रस्तावास दि. २६ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निफाड (जि.नाशिक) तालुक्यात होणारा दुषित पाणीपुरवठा**

**(१४) १९१७५ (२९-०७-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (नाशिक) तालुक्यातील अर्धाअधिक भागातील पाणी पुरवठा ५० टक्क्या पेक्षा अधिक दुषित असल्याची बाब माहे मे, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा परिषदेच्या आरोग्य समितीच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने व जिल्हा पर्यावरण समितीने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दूषित पाणी पुरवठा होण्याची कारणे काय आहेत, संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, जिल्हा पर्यावरण समितीने याबाबत कोणती उपाय योजना सुचविलेली आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०६-२०१५) :** (१) हे, खरे नाही.

माहे मे, २०१२ व त्या दरम्यानच्या जिल्हा आरोग्य समितीच्या इतिवृत्तीची पडताळणी केली असता ५०% पाणी नमुने दुषित असल्याची बाब नमूद नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुळगांव बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीतील शिधावाटप कार्यालयाची झालेली दुरवस्था**

**(१५) १९३०७ (३१-०७-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगांव बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीतील शिधावाटप अधिकारी कार्यालयाची दुरवस्था झालेली असून अपूरा कर्मचारीवर्ग व अपुरी जागा असल्याने तेथील नागरिकांची कामे

वेळेवर होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे व नाराजीचे वातावरण तयार झाल्याचे माहे जून २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पुरेसा कर्मचारी वर्ग व जागा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (१४-०९-२०१५) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

या संदर्भात शिधावाटप कार्यालयाच्या जागेबाबत स्थलांतराची कार्यवाही प्रस्तावित असून, सद्य:स्थितीत नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून कार्यालयातील अभिलेख कार्यालयात एका बाजूस व्यवस्थित जतन करुन ठेवलेले आहे व आतील जागेचा भाग नागरिकांसाठी मोकळा करण्यात आला आहे.

---

## सिंधुदूर्ग जिल्ह्यात चिरेखाणी मध्ये पाणी साठवून पाणीपुरवठा करण्याची योजना

**(१६) १९५२१ (२९-०७-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यात व सिंधुनगरी येथे ३५०० ते ४००० मी. मीटर पाऊस पडूनही दरवर्षी निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी उपाययोजना म्हणून चिरेखाणी मध्ये पाणी साठवून टॅन्करने पाणीपुरवठा करण्याच्या योजनेचा निर्णय सिंधुदूर्ग जिल्हा परिषदेने घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती काय आहे व जिल्ह्यातील किती तालुक्यातील गावांमधून सदर योजना राबविली जात आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत वा कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-०९-२०१५) :** (१), (२) व (३) जिल्हा परिषद सिंधदुर्गच्या दि. २६.०८.२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या बैठकीत अशी सूचना करण्यात आली होती की बंद असलेल्या चिरेखाणीमध्ये पाणी साठवून ठेवणेबाबत उपाययोजना केल्यास, साठलेले पाणी शेती व अन्य कामांसाठी शेतक-यांना वापरता येईल का यासाठी प्रयोगिक तत्वावर एक चिरेखाण निवडून पाणी साठविणेसाठी आवश्यक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे व या कामासाठी नाविन्यपूर्ण योजनेतून जिल्हा नियोजन विभागाकडून आवश्यक तरतूद उपलब्ध करणेत यावी.

तथापि, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक बाबींची पूर्तता ग्रामपंचायतीकडून करण्यात आली नाही. त्यामुळे पुढील कार्यवाही करता आलेली नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे विभागीय कार्यालय नाशिक येथे स्थलांतरीत करण्याबाबत**

**(१७) १९५६८ (२९-०७-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे विभागीय कार्यालय नाशिक येथे स्थलांतरीत करण्याचे आदेश दिल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालय नाशिक येथे स्थलांतरीत झाल्यास मालेगाव येथील ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचे नियंत्रण विस्कळीत होणार असल्याने सदर निर्णय शासनाने तातडीने बदलण्याची नागरिकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२१-०९-२०१५) :** (१) होय,

(२) व (३) याबाबत नागरीकांकडून कोणतीही लेखी मागणी या कार्यालयास प्राप्त नाही. तथापि, आमदार आसिफ शेख यांनी दिलेल्या अर्जानुसार मालेगांव विभागाचे स्थलांतर स्थगित करणेबाबत मागणी केलेली आहे. तसेच महाराष्ट्र जलसेवा कर्मचारी महासंघाच प्रदेश अध्यक्ष, श्री.टी.जी. पिंजन यांनी सदर स्थलांतर स्थगिती करणेबाबत मागणी वजा निवेदन मा.मंत्री महोदय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई मा.पालक मंत्री नाशिक जिल्हा, तसेच मा.सहकार राज्यमंत्री, मुंबई यांना दिलेले आहे. तथापि तत्पुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील विविध अडचणी तसेच प्राधिकरणाचे प्रशासकीय दृष्टया कामकाज करणे सोयीचे व सुलभ होण्याकरिता, प्रादेशिक मुख्य अभियंता स्वरुपाची संरचना प्राधिकरणाने दि. २९.४.२०१५ च्या आदेशान्वये दिनांक १.५.२०१५ पासून अस्तित्वात आणण्यात आलेली आहे. त्यानुसार मालेगाव विभाग, नाशिक येथेच कार्यरत करणे प्रशासकीय दृष्ट्या आवश्यक असल्याने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, नाशिक कार्यालय सुरु करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोपरी (जि.ठाणे) येथील अन्न व नागरी पुरवठा विभागाची गोदामाची जागा नागरी सुविधांसाठी देण्याबाबत**

**(१८) १९७२५ (३१-०७-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.गुलाबराव**

**पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुभाष साबणे (देगलूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे (पूर्व) येथील कोपरी भागातील अन्न व नागरी पुरवठा विभागाची सुमारे ३ हजार चौरस मीटर गोदामाची जागा नागरी सुविधांसाठी देण्याच्या संदर्भात मा. ठाणे पालकमंत्री व अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांची दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले सदर निर्णयाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०९-२०१५) :**(१) होय, दि. १२ मे, २०१५ रोजी मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली कोपरी (जि.ठाणे) येथील शासकीय गोदामाची जागा ठाणे महानगर पालिकेस हस्तांतरीत करण्याबाबत मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा पालक मंत्री, ठाणे यांच्या उपस्थितीत बैठक झाली आहे.

(२) या संदर्भात या बैठकीमध्ये ठाणे महानगरपालिकेला विहित प्रस्ताव पाठविण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगांव जिल्ह्यात धान्य व रॉकेल वाटपात होणारी अनियमितता व संगणकीकृत रेशन कार्ड तयार करण्याकरिता मुदतवाढ देण्याबाबत

**(१९) १९७४३ (३१-०७-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेकडून करण्यात येणारा धान्य व रॉकेल वाटपात अनियमितता होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात पुरवठा विभागाकडे तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त जिल्ह्यात संगणकीकृत रेशन कार्ड तयार करण्याचे काम ४० टक्केच झाल्यामुळे अनेक कुटुंबे रेशन कार्डापासून वंचित असल्याने त्यास एक महिन्याची मुदत वाढ देण्याची मागणी माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०९-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) राज्यात संगणकीकृत रेशनकार्ड वितरणाचे काम अद्याप सुरु नाही. त्यामुळे मुदतवाढ देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाने हमीभावाने खरेदी केलेला मका व्यापाऱ्यांना अल्प दरात विकल्याबाबत**

**(२०) १९७७१ (३१-०७-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने शेतकऱ्यांकडून १३१० रूपये हमीभावाने खरेदी केलेला मका अत्यंत अल्प दरात म्हणजेच केवळ ८०० रुपये क्विंटल दराने व्यापाऱ्यांना विकल्यामुळे शासनाला रु. २ कोटी ६४ लाख रुपयांचा तोटा सहन करावा लागला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०९-२०१५) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

तथापि, खरीप पणन हंगाम २०१३-१४ साठी रु. १३१०/- प्रतिक्विंटल हमीभाव दराने खरेदी केलेल्या १५ जिल्हयांतील मका, केंद्रीय साठयातून वगळून इ-लिलावाव्दारे विक्री करण्यास केंद्र शासनाने निदेश दिले असून, त्या निदेशानुसार लिलावाव्दारे सरासरी रु. ८००/- ते रु. ११४०/- प्रतिक्विंटल दराने मका विक्री करण्यात आला. या विक्रीतून रु. ९५.५९ कोटी जमा झाले असून उर्वरित रक्कम प्राप्त होण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ओलमण (ता.कर्जत,जि.रायगड) विहिरींची झालेली दुरवस्था**

**(२१) १९८१२ (२९-०७-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओलमण (ता.कर्जत,जि.रायगड) ग्रामपंचायत मध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य मोठ्या प्रमाणात असून पिण्याच्या पाण्याच्या विहिरी कोणत्याही क्षणी कोसळण्याच्या स्थितीत असल्याने माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे तेथील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याकरिता वणवण करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावातील पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

ओलमण (जि.कर्जत, जि.रायगड) येथे एकूण चार पाण्याच्या विहिरी व एक विंधन विहिर आहे. उन्हाळ्यात या विहीरीचे पाणी कमी झाल्याने पिण्याच्या पाण्याची टंचाई भासते. मात्र टंचाई कालावधीत मागणीनुसार टँकरचे पाणी पुरवठा केला जातो. गावातील पिण्याच्या पाण्याच्या विहिरी कोसळण्याच्या स्थितीत नाहीत.

(३) सदर गावातील जुन्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरीचे खोली करणे व रुंदीकरण करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला असून पिण्याच्या पाण्याचा उद्भव वाढविण्यासाठी सदरचे काम लवकरात लवकर मंजूर करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विधानसभा मतदार संघ निहाय नविन शिधावाटप कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(२२) २०७३३ (३१-०७-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने विधानसभा मतदार संघ निहाय नविन शिधावाटप कार्यालय सुरु करण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार भिवंडी (पूर्व) येथे भादवड, टेमघर, शांतीनगर, नवी वस्ती, ताडाळी, पद्मानगर पोगांव, चाविंद्र इत्यादी भागात नविन शिधावाटप कार्यालय सुरु करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी, (भिवंडी पूर्व) यांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास उपनियंत्रक शिधावाटप, “फ”परिमंडळ, ठाणे यांना निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार उक्त भागात शिधावाटप कार्यालय सुरु करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०९-२०१५) :**(१), (२) व (३) प्रश्नामध्ये नमुद केलेले निवेदन प्राप्त झालेले नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यात हमीभावाने भात खरेदी केंद्र सुरु नसल्याबाबत**

**(२३) २१०२२ (३१-०७-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यात अद्यापर्यंत हमीभावाने भात खरेदी केंद्र सुरु करण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाकडे खरेदी केलेला भात ठेवण्यास शासकीय गोदामे उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गोदामे उपलब्ध करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०९-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे आहे. तथापि, किमान आधाराभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत सन २०१३-१४ मध्ये खरेदी केलेल्या धानाची भरडाई न झाल्याने गोदामात ते साठून राहिले. यास्तव गोदाम उपलब्ध होण्यासाठी सन २०१३-१४ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या धानाची ई-लिलावाव्दारे विक्री करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागझरी (सिंदखेड राजा जि.बुलडाणा) येथील महाजल योजनेअंतर्गत नळयोजना ग्रामपंचायतीला हस्तांतरीत करण्याबाबत**

**(२४) २१०६५ (२९-०७-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागझरी (सिंदखेड राजा जि.बुलढाणा) येथील महाजल योजनेअंतर्गत सन २००९ ते २०१० या कालावधीमध्ये पूर्ण होऊनही सदर नळयोजना ग्रामपंचायतीला हस्तांतरीत झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेमध्ये गैरव्यवहार झाला असल्याची तक्रार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बुलढाणा यांच्याकडे दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली व सदर योजना हस्तांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय,
याबाबत चौकशी सुरु आहे. पाणी पुरवठा समिती नागझरी व सरपंच, सचिव ग्रामपंचायत दरेगांव (नागझरी) यांना उपविभागामार्फत योजनेव्दारे पाणी पुरवठा सुरळीत करण्याबाबत व योजना हस्तांतरीत करण्याबाबत दि. ७.४.२०१५ व दि. १.७.२०१५ च्या पत्रान्वये

सुचीत करण्यात आले असून चौकशी करिता पाणी पुरवठा समितीकडील सर्व दस्तऐवजाची मागणी केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा पंचायत समितीअंतर्गत पाणी टंचाई निवारणार्थ प्राप्त निधीत अनियमितता झाल्याबाबत**

**(२५) २१०७६ (२९-०७-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा पंचायत समिती अंतर्गत सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या वर्षी पाणी टंचाई निवारणार्थ दीड कोटी रुपयांची तरतुद प्राप्त झाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा स्थानिक निधी लेखा परिक्षणामध्ये सदर प्राप्त अनुदानात ४६ लक्ष रुपयाची अनियमितता झाली असल्याचे निष्पन्न झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने दोषी असलेल्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-०९-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) होय, चौकशी करण्यात आली आहे.
दोषी असलेल्यांवर कारवाई करण्यात आली असून त्यांची एक वार्षिक वेतनवाढ दोन वर्षांसाठी रोखण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाड (जि.रायगड) येथील आदिवासी वाड्यांच्या नळ पाणीपुरवठा योजनांबाबत**

**(२६) २१३३३ (३१-०७-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) येथील १३४ ग्रामपंचायतीपैकी ७७ ग्रामपंचायतीमध्ये असणा-या आदिवासी वाड्यांच्या नळ पाणीपुरवठा योजनेबाबत तसेच येथील पाणी टंचाईबाबत कोणतीही माहिती देण्यास संबंधित पंचायती उदासिन असून याबाबत आदिवासी समाजाच्या शिरगाव महिला सरपंचानी विचारणा केली असता संबंधित ग्रामसेवकाने दुर्लक्ष केल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चोकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितावर कारवाई करण्याबाबत तसेच आदिवासी वाडयांपर्यत शासनाची पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) महाड तालुक्यातील ६२ आदिवासी वाड्यावर पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध असून सदर वाड्यांपैकी कोणत्याही आदिवासी वाडीची पाणी पुरवठा योजनेबाबतची मागणी प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिमूर व नागभिड (जि.चंद्रपूर) तालुक्यात हातपंपांची उभारणी करण्याबाबत

**(२७) २१४०१ (२९-०७-२०१५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिमुर व नागभिड (जि.चंद्रपुर) तालुक्यात सन २०१५ च्या प्रखर उन्हाळ्यात भीषण पाणी टंचाईमुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी टंचाईग्रस्त भागामध्ये हातपंप मंजुर करण्यासाठी जिल्हा प्रशासनास दिनांक ८ मे २०१५ रोजी वा त्यासुमारास विनंती केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणी केलेले हातपंप जिल्हा प्रशासनाने मंजुर केलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तालुक्यात स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागणी केल्याप्रमाणे मंजूर हातपंपाची उभारणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

चिमूर तालुक्यातील ४६ गावांमध्ये ७६ हातपंप मंजूर केले आहेत. तसेच नागभिड तालुक्यातील ११ गावांमध्ये १३ हातपंप मंजूर करण्यात आले आहेत.
(३) दि. ८ मे, २०१५ च्या पत्रान्वये चिमूर तालुक्यातील गांवे मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. चंद्रपूर यांनी पुरवणी आराखड्यात समाविष्ठ करुन सदर ३८ गावांपैकी १९ गावांचे सर्वेक्षण पूर्ण केले. या १९ गावांपैकी ९ प्रकरणे सर्वेक्षणअंती विहिरीसाठी योग्य आढळली. तथापि, मान्सून सुरु झाल्यामुळे विंधण विहिरींची कामे होऊ शकली नाहीत.

नागभीड तालुक्यातील टंचाई आराखड्यातील समाविष्ठ ३ गावांपैकी ३ गावांचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यात योग्य आढळून आलेल्या २ गावांमध्ये हातपंप बसविण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील दादासाहेब फाळके स्मारक परिसरातील प्रादेशिक वस्तुसंग्रहालय बंद असल्याबाबत**

**(२८) २२४३८ (३१-०७-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील दादासाहेब फाळके स्मारक परिसरातील प्रादेशिक वस्तुसंग्रहालय गत काही वर्षापासून बंद अवस्थेत असून संग्रहालयातील दुर्मिळ व मौल्यवान वस्तु धूळखात पडल्या असल्याचे दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वस्तुसंग्रहालय बंद ठेवण्याची कारणे काय आहेत व सदर वस्तुसंग्रहालय पुर्ववत सुरु ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने सदर वस्तुसंग्रहालय बंद होते. अभिरक्षक पद हे प्रतिनियुक्तीने व अन्य पदे भरण्यात आली आहेत. आता सदर संग्रहालय पुर्ववत सुरु ठेवण्यात आले आहे.

---

**राज्यात दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या संख्येबाबत**

**(२९) २२४९९ (३१-०७-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची एकूण संख्या किती आहे, अशा कुटुंबाना शासकीय सुविधा कोणत्या स्वरुपाच्या पुरविण्यात येत आहेत,

(२) असल्यास, गेल्या पाच वर्षात त्या कुटुंबात झालेला बदल शासनाच्या अपेक्षेप्रमाणे आहे काय आणि त्यांचा आर्थिक स्तर उंचावला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, असल्यास पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-०९-२०१५) :**(१) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची एकूण संख्या ७०,०७,५८९ आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अंत्योदय अन्न योजनेतील सर्व लाभार्थ्यांना प्रति शिधापत्रिका प्रतिमाह ३५ किलो अन्नधान्य व प्राधान्य कुटुंब गटामध्ये समावेश करण्यात आलेल्या बीपीएल व एपीएल (केशरी) मधील काही लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो अन्नधान्याचे वाटप करण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडघम, कोतवाली (ता.सिरोंचा, जि.गडचिरोली) परिसरात कोट्यवधी वर्षापूर्वीचे डायनासोरचे जीवाश्म आढळून आल्याबाबत**

**(३०) २२७४४ (३१-०७-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडघम, कोतवाली (ता.सिरोंचा, जि.गडचिरोली) परिसरात कोट्यवधी वर्षापूर्वीचे डायनासोरचे जीवाश्म आढळून आल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :**(१) नाही,

तथापि, डायनोसोरचे जीवाश्म सन १९८४-८५ च्या आधीच सापडले असल्याचे Director, Park and Museum Division, Nagpur यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विक्रोळी, कन्नमवार नगर येथील शिधापत्रिका कार्यालयाच्या नविन इमारतीबाबत**

**(३१) २२९१० (३१-०७-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विक्रोळी, कन्नमवार नगर शिधापत्रिका कार्यालयाची इमारत पूर्णत: मोडकळीस आली असल्याने शिधापत्रिका कार्यालयासाठी नविन इमारत बांधुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, विक्रोळी व स्थानिक नागरीकांनी केली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील शिधापत्रिका कार्यालयासाठी नविन इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०९-२०१५) :**(१), (२) व (३) या संदर्भात सन्माननीय विधानसभा सदस्यांचे दिनांक ८ जानेवारी, २०१५ चे निवेदन प्राप्त झाले आहे. त्यास अनुसरून उप नियंत्रक, ई परिमंडळ कार्यालयाच्या दि. १७.८.२०१५ व दि. २१.८.२०१५ च्या पत्रान्वये शिधावाटप कार्यालय क्र. ४५ ई या कार्यालयाच्या जागेचा पुनर्विकास करण्याबाबत मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

---

**अढ्याळ (जि.भंडारा) येथे वन विभागामार्फत लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदानित सिलेंडर इतरत्र वापरत असल्याबाबत**

**(३२) २३३४६ (३१-०७-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अढ्याळ (जि.भंडारा) येथे वन विभागातर्फे लाभार्थ्यांना घरगुती वापरासाठी देण्यात येणारे अनुदानित सिलेंडर अढ्याळ व परिसरातील हॉटेल, चायनीज सेंटर व्हॅन, चाय टपरी तसेच आठवडी बाजारातील दुकानांमध्ये मोठया प्रमाणात गैरवापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकांना सिलेंडर मिळविण्यासाठी कंपनीकडे एसएमएस विशेष क्रमांक डायल करून मागणी नोंदवावी लागते मात्र, व्यावसायिकांना हजार रुपयात सिलेंडर उपलब्ध होतो अशा तक्रारी ग्राहकांनी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) अशा प्रकारे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टेंभोडे (ता.पनवेल,जि.रायगड) तसेच अनेक गावांतील पाणीटंचाईबाबत**

**(३३) २३६२५ (२९-०७-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील अनेक गावांना दरवर्षी पाणीटंचाईला सामना करावा लागत असून पाणीपुरवठा करण्यासाठी अवघ्या दोन टँकरना मंजूरी देण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टेंभोडे (ता.पनवेल) गावची लोकवस्ती २ हजार ३४९ इतकी आहे सिडकोच्या पाणीपुरवठा योजनेला विलंब लागत असल्याने या गावाला दरवर्षी पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पाणी पुरवठा करण्याबाबत प्रभावी उपाय योजना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१५-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

टेंभोडे, (ता.पनवेल) येथे सिडको विभागाकडून नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.सदरची योजना पूर्ण झाल्यानंतर टेंभोडे गावास पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होणार आहे. टेंभोडे या गावी २ विंधण विहिरी आहेत त्यापैकी एका विंधण विहिरीवर विद्युत पंप बसवून पाणी पुरवठा सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

सिडको विभागाकडून स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना टेंभोडे गावासाठी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील सिंहगड, राजगड, रायगड आणि तोरणा या गडावरील दुर्गावशेषांचे विद्रुपीकरण होत असल्याबाबत

**(३४) २३६७३ (३१-०७-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील सिंहगड, राजगड, रायगड आणि तोरणा या गडावरील दुर्गावशेषांचे विद्रुपीकरण होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुर्गावशेषांच्या दुरुस्तीच्या कामामध्ये सिमेंटचा मोठया प्रमाणात वापर करून सदर कामासाठी जाणकार वास्तुतज्ञांचा अभाव, ठेकेदार परवडेल असे अंदाजपत्रक आणि तरतूदी, पुरातत्व खात्याच्या अधिका-यांचे दुर्लक्ष यामुळेच नियमबाह्य पध्दतीने सदर गडांची दुरुस्ती सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच संबंधितांवर व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

रायगड किल्ला राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय मुंबई यांच्या अखत्यारीत येतो. तसेच सिंहगड किल्ल्याच्या जतन व दुरुस्ती कामामध्ये त्रुटी आढळून आल्याचा अहवाल कॉलेज ऑफ इंजिनियरिंग पुणे यांनी सादर केला होता. सदर अहवालास अनुसरुन सदर कामाचे कंत्राटदार व वास्तुविशारद यांना विभागाच्या दिनांक १६ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये विभागाच्या कंत्राटदार व वास्तुविशारद यांच्या नामिकासूचीतून वगळण्यात आले आहे. तसेच सदर कामाचे कनिष्ठ अभियंता यांचेवर पुरातत्व संचालनालयामार्फत नियमानुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडीतील (जि.ठाणे) शिधावाटप दुकानांमध्ये आवश्यक असलेला रॉकेलचा साठा पुरविण्यात येत नसल्याबाबत

**(३५) २३७४२ (३१-०७-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडीतील (जि.ठाणे) १२० शिधावाटप दुकानातील सेल ऑफ टेकच्या वेळी ज्या शिधापत्रिकांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली त्यानुसार प्रत्यक्ष तपासणी झालेल्या शिधापत्रिकांधारकांसाठी आवश्यक असलेला रॉकेलचा साठा त्या दुकानदारांना पुरविण्यात येत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यांची कारणे काय आहेत, याबाबत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत
आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०९-२०१५) :**(१) व (२) भिवंडी शिधावाटप कार्यालय क्षेत्रांतर्गत माहे ऑक्टोबर व माहे डिसेंबर, २०१२ या कालावधीत घेण्यात आलेल्या शिधापत्रिका पडताळणी मोहिमेच्या कालावधीत जे शिधापत्रिकाधारक शिधाजिन्नस घेण्यासाठी शिधावाटप दुकानात आले नाहीत त्यांच्या शिधापत्रिका प्रथम निलंबित व त्यानंतर रद्द करण्यात आल्या. सेल ऑफ टेक मोहिमेअंतर्गत शिधावाटप दुकानात प्रत्यक्ष उपस्थित न झालेल्या शिधापत्रिकाधारकांच्या शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या. त्यामुळे रद्द करण्यात आलेल्या शिधापत्रिकाधारकांवर केरोसिन नियतन मंजूर करण्यात आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पळासखेडे ( ता.पारोळा जि.जळगांव ) येथील नळयोजनांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(३६) २४०३२ (२९-०७-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळासखेडे (सीम) (ता.पारोळा जि.जळगांव) या गावासाठी दोन पाण्याच्या योजना मंजूर होवूनही त्या गावाचा पिण्याचा प्रश्न अद्यापही सुटलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावात तिसऱ्यांदा नवीन योजना मंजूर झालेली असून सदरचे काम ग्रामपंचायतीमध्ये मतभेद असल्यामुळे तिसरी योजनाही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या तिन्ही योजनांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) योजनांबाबतची सविस्तर चौकशी करुन संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**शहापूर आणि आसनगाव (जि.ठाणे) करिता असलेल्या भातसा नदीवरील पाणी पुरवठा योजनेचा शुध्दीकरण प्रकल्प बंद असल्याबाबत**

**(३७) २४१८२ (२९-०७-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर आणि आसनगाव (जि.ठाणे) करिता भातसा नदीवर सन १९८३ साली पाणी पुरवठा योजना सुरु करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना ३३ वर्षे जुनी असून अनेक वर्षे या योजनेचा शुध्दीकरण प्रकल्पच बंद असल्याने तेथील नागरिकांना अशुध्द पाण्याचा पुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या नागरिकांना शुध्द पाणी पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) मौजे आसनगाव व शहापूर येथील नळ पाणी पुरवठा योजना सन १९८३ साली कार्यान्वित करण्यात आली आहे. आसनगावसाठी सन २००० साली स्वतंत्र पाणी पुरवठा योजना राबविण्यात आली असून या योजनेतील जलशुध्दीकरण केंद्राद्वारे आसनगावला शुध्द पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच शहापूर साठी पाणी पुरवठा करणारे जलशुध्दीकरण प्रकल्प नगरपंचायतीद्वारे देखभाल दुरुस्ती न केल्याने बंद असून शहापूर या नगरपंचायतीस सद्य:स्थितीत TCL व अॅलम टाकून शुध्द पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हा परिषदेतील पाणी पुरवठ्याच्या बारा गावांच्या योजनेत तसेच निंबी (ता.पुसद)येथील राष्ट्रीय पेयजल योजनेत झालेल्या अपहाराबाबत**

**(३८) २४५७६ (२९-०७-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हा परिषदेतील ग्रामीण भागात पाण्याची समस्या दुर व्हावी म्हणुन शासनाकडून विविध पाणीपुरवठा योजना राबवून कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले असून

त्यातील आर्णी, घाटंजी, उमरखेड, मारेगांव, पांढरकवडा, पुसद व यवतमाळ पंचायत समितीतील अकोला, बाजार, बारड तांडा, भिसनी, हातगांव, कण्णापुर, मांर्जडा अशा एकूण १२ योजनांमध्ये गैरप्रकार झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाणीपुरवठा योजनांमध्ये झालेल्या गैरप्रकार प्रकरणी जिल्हा परिषद यवतमाळ प्रशासनाकडून 'एफआयआर' साठी आदेश निर्गमीत करुनही अद्याप पर्यंत कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच निंबी (ता.पुसद) गावामध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेच्या कामामध्ये तब्बल नऊ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाला असून सदर योजनेतील रक्कम समितीचे अध्यक्ष व सचिवांनी परस्पररित्या खात्यातुन काढले,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (३) मधील पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष, सचिव, सरपंच व ग्रामसेवक हे जबाबदार असल्याची तक्रार पाणी पुरवठा समितीचे १२ सदस्यांनी कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग जि.प.यवतमाळ यांचेकडे केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५)** :(१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही. १२ योजनांच्या समित्यांकडून मुल्यांकनापेक्षा जादाचा खर्च केला असल्यामुळे आर्थिक अनियमितता झाली होती.

हातगांव, अकोलाबाजार, कृष्णापूर सालोड, बारड तांडा, मांजर्डा ता. यवतमाळ, तळणी कु-हा ता.आर्णी व शिवाजीनगर ता. उमरखेड अशा ७ समित्यांवर कारवाई करुन योजनांची जादाची उचल केलेली रक्कम भरुन घेण्यात आली असून, योजनेची कामे मार्गी लावण्यात आली आहेत.

भिसणी ता.यवतमाळ, तिवसाळा ता.घाटंजी व खेड ता. आर्णी या ३ समित्यांनी कारवाईस प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांच्यावर FIR दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच सावर ता. बाभूळगाव व राजना ता.पुसद या २ समित्यांवर FIR करण्याबाबत अथवा रक्कम भरुन घेण्याबाबतची कारवाई सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) नाही. सदर योजनेच्या कामात गैरव्यवहार झालेला नाही. परंतू तक्रार प्राप्त झालेली आहे.

(५) होय, तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अभियंता यांनी चौकशी केलेली आहे. सदर तक्रारीमध्ये तथ्य आढळले नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत पाणीपुरवठा योजनेतील पाणी दुषित असल्याचे आढळल्याबाबत**

**(३९) २४९४० (२९-०७-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत पाणीपुरवठा योजनेतील पाणी नमुना तपासणीत ३ हजार १३७ नमुने दुषित आढळून आले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायती मध्ये पाणी शुध्दतेसाठी वापरण्यात येणाऱ्या टीसीएल नमुन्यापैकी तब्बल ४३ नमुने दुषित आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दूषित पाणी पुरवठा होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच संबंधितांवर व ग्रामपंचायती वर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) दुषित स्त्रोतांचे टीसीएल पावडरव्दारे शुध्दीकरण करुन सदर स्त्रोतांमधील पाणी नमुन्यांची पुनर्तपासणी करण्यासाठी तसेच क्लोरीनचे प्रमाण २०% पेक्षा कमी असलेल्या ग्रामपंचायतींना सदर टीसीएल न वापरणेबाबत व नवीन टीसीएल मानांकनानुसार खरेदी करुन त्याची तपासणी करुन पाणी शुध्दीकरण करणेबाबत तालुकास्तरावर गट विकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी यांनी संबंधित ग्रामपंचायतींना याबाबत कार्यवाही करुन अंमलबजावणी करणेबाबत सुचित करण्यात आले आहे.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राष्ट्रीय पेयजलच्या कामात झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्याची मागणी**

**(४०) २४९६४ (३१-०७-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या त्रैमासिक सभेत उपस्थित असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्याचे खासदार यांनी मा. पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत नुकत्याच झालेल्या बैठकीत 'राष्ट्रीय पेयजल' च्या कामात झालेली अनियमिततेची तात्काळ चौकशी करावी व यामधील दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर बैठकीतील मागणीच्या अनुषंगाने चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, सदर बैठकीतील मागणीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील गेल्या तीन वर्षात बांधलेल्या विहिरींची तपासणी व चौकशी करण्यात आली असून चौकशीअंती सदर कामामध्ये

अनियमितता व गैरव्यवहार झालेला दिसून आलेला नाही. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जालना जिल्ह्यात व रांजणी (ता.धनसावंगी) येथे निर्माण झालेली पाणीटंचाई

**(४१) २५१७१ (२९-०७-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रांजणी ((ता.धनसावंगी,जि.जालना) येथे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असल्याचे व सदर तालुक्यात सन २०१२ पासून दुष्काळाचा सामना करावा लागत आहे येथे पाण्याचे नियोजन करण्यासाठी लाखो रुपये खर्च होऊनही पाणीटंचाई दूर झाली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जालना जिल्ह्यात पाणी पुरवठा योजना मोठ्या प्रमाणात मंजूर झाल्या असून त्यापैकी ७० टक्के गावात अद्याप सदर योजना सुरु झाल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे, त्यानुषंगाने उक्त जिल्ह्यात व रांजणी येथील तीव्र पाणी टंचाई वर मात करण्यासाठी व पाणी पुरवठा योजना सुरु करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-०९-२०१५) :**(१) व (२) अंशतः खरे आहे.

(३) ज्या योजनेच्या उद्भवास पुरेसे पाणी मिळत नाही. तेथील स्थळ पाहणी करुन खाजगी विहीर अधिग्रहण करुन/टँकरव्दारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येते, त्या प्रमाणे रांजणी येथे टंचाई कालावधीत टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात राबविण्यात येणारा शांताकुमार समितीचा अहवाल रद्द करण्याची मागणी

**(४२) २५५४९ (३१-०७-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राबविण्यात येणारा शांताकुमार समितीचा अहवाल नागरीकांवर अन्याय करणारा असल्याने सदर अहवाल रद्द करण्यात यावा या मागणीसाठी राज्यभरातील तहसिल कार्यालयावर माहे एप्रिल, २०१५ पासून मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर अहवाल रद्द करण्यात यावा अशी मागणी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधी, चंदगड यांनी दिनांक १५ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर अहवाल रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०९-२०१५)** :(१) नाही. तथापि अशा मागणीसाठी जिल्हा पुरवठा कार्यालय, कोल्हापूर व सांगली येथे मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.
(२) होय.
(३) शांताकुमार समितीच्या अहवालान्वये सादर केलेल्या शिफारशींवर कार्यवाही करण्याची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील गावामध्ये होणारा दुषित पाणी पुरवठा**

**(४३) २५६६१ (२९-०७-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात ५५ गावांमध्ये दुषित पाणी पुरवठा होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :** (१) व (२) सांगली जिल्ह्यात माहे एप्रिल, २०१५ मध्ये एकुण १४३८ पाणी नमुन्यांची जैविक तपासणी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा व उपविभागीय प्रयोगशाळेकडे केली असता ५२ गावांतील ६९ ठिकाणाचे पाणी नमूने दुषित आढळून आले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये प्राप्त झालेल्या तपासणी अहवालावरुन दिसून आले आहे. प्राप्त अहवालावरुन जिल्हा कार्यालयाकडून गटविकास अधिकारी व जिल्हा आरोग्य विभागाकडून गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र यांचे मार्फत संबधित ग्रामपंचायतीना दुषित आलेल्या स्त्रोतांचे शुध्दीकरण करुन घेऊन शुध्द पाणी पुरवठा करणेबाबत लेखी सुचना देण्यात आल्या होत्या त्यानुसार संबंधित ग्रामपंचायतींनी दुषित स्त्रोतांचे टीसीएल ने शुध्दीकरण करुन पाणी नमूने फेर तपासणीसाठी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा व उपविभागीय प्रयोगशाळेकडे पाठविले आहे. सदरचे नमूने तपासणी पश्चात योग्य असल्याचे आढळून आले आहे.

तसेच ग्रामपंचायत अंतर्गत कार्यरत असणा-या जलसुरक्षक/पाणी पुरवठा कर्मचारी यांचे मार्फत स्त्रोतांची परिसर स्वच्छता, पाणी पुरवठा यंत्रणेतील दोष दुरुस्ती करणेबाबत कळविण्यात आले आहे. तसेच जिल्ह्यामध्ये २५ मे ते १५ जून, २०१५ या कालावधीत साथ रोग मुक्त जनजागृती अभियान राबविण्यात आले आहे. यामध्ये स्त्रोतांची परिसर स्वच्छता,

सर्वेक्षणात आढळून आलेल्या तीव्र व जोखीम स्त्रोतांच्या त्रुटी दूर करणे, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे शुध्दीकरण, साठवण टाकीची स्वच्छता व शुध्दीकरण करणेबाबतची जनजागृती मोहिम राबविण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील पाण्याचे स्त्रोत दूषित असल्याबाबत**

**(४४) २५७०२ (२९-०७-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील सर्वच तालूक्यातील पाण्याची तपासणी केली असता पाण्याचे स्त्रोत दूषित असल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व तद्नुसार सदर जिल्हयातील नागरीकांना स्वच्छ शुध्द व पुरेसे पाणी मिळावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :**(१) होय,
कोल्हापूर जिल्हयातील एकूण १२ तालुक्यातील ११३९, पाण्याच्या नमुन्यांची अनुजैविक तपासणी माहे मे, २०१५ मध्ये करण्यात आली होती. तपासणीमध्ये त्यापैकी १५१ नमुने दुषित आढळले.
(२), (३) व (४) दुषित नमुने आढळलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांना स्त्रोतांचे योग्य प्रमाणात टि.सी.एल. वा वापर करुन, स्त्रोतांतील पाण्याचे शुध्दीकरण करुन पाणी नमुने पुनर्तपासणीसाठी पाठविणेबाबत जिल्हा प्रशासनाकडून सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार करण्यात आलेल्या पुनर्तपासणीत प्राप्त १३५ पैकी १२५ नमुने योग्य आढळले. तपासणीस न आलेले १६ व पुनर्तपासणीत अशुध्द आढळलेले १० असे एकूण २६ स्त्रोतांतील पाण्याचे शुध्दीकरण करुन जुलै अखेर पुनः करण्यात आलेल्या तपाणीत २६ पैकी १८ नमुने योग्य आढळले.
उर्वरित ८ स्त्रोतांचे पाणी योग्य पध्दतीने शुध्दीकरण पुन्हा पुनर्तपासणीसाठी पाठविण्यातबाबत संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रास कळविण्यात आले आहे.

---

## मौ.सुडकोली व मौ.रेवदंडा (ता. अलिबाग जि, रायगड) येथील धान्य गोदाम दुरुस्त करण्याबाबत

**(४५) २५७६२ (३१-०७-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सुडकोली व मौजे रेवदंडा (ता. अलिबाग, जि. रायगड) येथील शासनाचे धान्य गोदाम नादुरुस्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गोदामामधील होणाऱ्या धान्याची नुकसान भरपाई शासन देणार आहे काय,

(३) असल्यास, सदर गोदाम दुरुस्तीकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०९-२०१५) :**(१), (२), (३) व (४) मौजे बापळे व मौजे. रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील शासकीय धान्य गोदाम नादुरुस्त असल्याने उपयोगात नाही त्यामुळे धान्य साठवणूक करण्यात येत नाही.

---

## मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमुळे स्थानांतरीत झालेल्या झोपडीधारकांच्या शिधापत्रिका रद्द न करण्याची मागणी

**(४६) २६१२५ (३१-०७-२०१५). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमुळे विकासकांकडून भाडे घेऊन स्थानांतरीत झालेल्या झोपडीधारकांच्या शिधापत्रिका रद्द करण्यात येऊ नये अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, वांद्रे (पूर्व) यांनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१३ रोजीच्या पत्रान्वये तत्कालिन मा. अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०९-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) शिधावाटप कार्यालय २९/ड, वांद्रे (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमुळे स्थलांतरीत झालेल्या कुटुबांपैकी काही कुटुंबे त्या विभागातील ट्रांझीट कँप मध्ये पुनर्वसन केलेले आहे. सबब सदर कुटुंबांच्या शिधापत्रिक रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. काही कुटुंबांना विकासकाने भाडे अदा केल्यामुळे ती कुटुंबे इतरत्र स्थलांतरीत झालेली आहेत अशा कुटुंबाच्या पैकी कोणाचीही शिधापत्रिका कार्यालयीन अभिलेखावरुन रद्द करणेत आलेली नाही. तसेच याबाबत कार्यालयात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. याबाबत शिधावाटप अधिकारी,

शिधावाटप कार्यालय क्र. २९/ड, वांद्रे (पूर्व) यांनी पत्र क्र. २९/ड/२०१४/शिप/जा. २७७, दि. २०.२.२०१४ अन्वये तत्कालीन मा.आमदार श्री.प्रकाश (बाळा) सावंत यांना नियमानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कळविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पांगरी (ता.सिन्नर,जि.नाशिक) येथील जलवाहिनी फोडून पाण्याची होत असलेली चोरी**

**(४७) २६८६३ (२९-०७-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांगरी (ता.सिन्नर,जि.नाशिक) येथील जलवाहिनी फोडून पाणी चोरीत असल्याने सदर गावातील लोकांना पाणी मिळत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीनुसार पाणी चोरी करणाऱ्यांना पकडण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :**(१) पांगरी (ता.सिन्नर, जि. नाशिक) येथील जलवाहिनी फोडून पाणी चोरी असल्याबाबत लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, पांगरी गावांस कमी दाबाने पाणी पुरवठा होतो. अशा प्रकारच्या तोंडी तक्रारी जिल्हा परिषद, लघु पाटबंधारे उपविभाग, सिन्नर येथे मे, २०१५ मध्ये करण्यात आल्या होत्या.
(२), (३) व (४) तोंडी तक्रारी नुसार योजनेची पहाणी केली असता दोन ठिकाणी शेतामध्ये मध्यवर्ती ठिकाणी उर्ध्व वाहिनीला नळ जोडणी केल्याचे आढळून आले. परंतू ही नळ जोडणी कोणी केली हे निदर्शनास आले नाही. ही नळ जोडणी तोडून पाईपालाईन पुर्ववत करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

---

**मेळघाट खा-याटेंबरु (जि.अमरावती) येथील नळयोजना बंद असल्याबाबत**

**(४८) २७०६४ (२९-०७-२०१५). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट खा-याटेंबरु (जि.अमरावती) येथील नळयोजना गत ३ आठवड्यापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नळयोजना बंद असल्यामुळे गावातील नागरिक पाण्यापासून वंचित असल्यामुळे पाणीपुरवठा होण्यासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बंद नळयोजना सुरू करून पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी कोणती व्यवस्था केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५)** :(१) हे अंशत: खरे आहे.
(२) नाही.

योजना बंद असलेल्या पाच दिवसांच्या कालावधीत ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक विहिरीवरुन व योजनेच्या विहिरीवरुन व योजनेच्या विहिरीवरुन तसेच हातपंपाव्दारे गावास पाणी पुरवठा होत होता.

(३) ग्रामपंचायत मार्फत योजनेच्या विहिरीवरील नादुरुस्त पंप ५ दिवसांत दुरुस्त करुन गावास पाणी पुरवठा सुरळीत सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यात वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४९) २७०९० (२९-०७-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील येत्या चार वर्षात घराघरात वैयक्तिक शौचालय बांधून संपूर्ण जिल्हा हागणदारीमुक्त करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैयक्तिक शौचालय बांधून त्याचा वापर करणाऱ्या कुटुंबास बारा हजार रुपये देण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात काटकसर केली जात असल्याने चार वर्षाचे दुरच पण चालू वर्षाचे उद्दिष्ट पूर्ण होणार नसल्याचे माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नाशिक जिल्ह्यात वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-०९-२०१५)** :(१) व (२) होय, हे खरे आहे.

उघड्यावरील शौचविधीची पध्दत बंद करुन संपूर्ण देश दि. २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत हागणदारी मुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चित करुन केंद्र शासनाने दि. २ ऑक्टोबर, २०१४ पासून स्वच्छ भारत अभियानाची अंमलबजावणी सुरु केली आहे.

(३) व (४) स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत संपुर्ण महाराष्ट्र राज्य हागणदारी मुक्त करण्यासाठी वैयक्तिक शौचालये बांधण्याचा कृती आराखडा मान्यतेसाठी केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे. या आराखड्यानुसार केंद्राकडून प्राप्त होणारा केंद्र निधीचा हिस्सा व राज्य निधीचा हिस्सा मिळून संपूर्ण राज्य दि. २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत हागणदारी मुक्त करण्याचे शासनाचे नियोजन आहे. त्यानुसार, नाशिक जिल्ह्याच्या हागणदारी मुक्तीसाठी मागणीनुसार आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोयगाव ( ता.मालेगाव,जि.नाशिक) येथे बांधण्यात आलेल्या जलकुंभाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत**

**(५०) २७२०४ (०६-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोयगाव (ता.मालेगाव,जि.नाशिक) येथे बांधण्यात आलेल्या जलकुंभाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याची बाब माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व याप्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.